दैनिक,सकाळ,सातारा,शुक्रवार,दि.23नोव्हेंबर2012,पान.क्र 2.

# ‘शिवकृपा’ची ३० वर्षांची गौरवशाली वाटचाल

**आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात (कै.) यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असलेला सहकार जोपासत कार्यरत असलेली शिवकृपा सहकारी पतपेढी ३० वा वर्धापनदिन साजरा करत आहे. त्या निमित्ताने पतपेढीची दीपस्तंभासारखी ३० वर्षांची गौरवशाली वाटचाल...**

## निमित्त

१९८२ मध्ये स्थापन झालेल्या ‘शिवकृपा’ची यशोगाथा एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे असून, १९८२- १९९० या कालावधीत खडतर प्रवास करणाऱ्या या संस्थेची वाटचाल आता सहकारातील दीपस्तंभ म्हणून गौरविली जाऊ लागली आहे. संस्थेच्या प्रगतीत विद्यमान अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी, सर्व आजी- माजी संचालक, अधिकारी,


अविनाश भोसले


हणमंत गायकवाड


पंढरीनाथ भोसले

कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधींचे मोलाचे योगदान आहे व त्यास संस्थेचे असंख्य सभासद, ठेवीदार, हितचिंतक, कर्जदारांनी संस्थेवर केलेले प्रेम, प्रतिसाद, विश्वास आणि सहकार्य यामुळेच सहकारातील नवीन आव्हाने पेलण्याची उमेद मिळाली. यामुळेच शिवकृपा एका नव्या दिशेने झेपावली आहे.

संस्थेच्या महाराष्ट्र कार्यक्षेत्रात ६३ शाखा, पाच विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून संस्थेचा एकूण व्यवसाय रुपये १२८५ कोटींचा असून, ठेवी रुपये ७०७ कोटी, तर कर्ज रु. ५७८ कोटी झाली आहे. संस्थेचा मार्च २०१२ अखेर ढोबळ नफा रुपये सहा कोटी इतका आहे. येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडो प्रमाण १.१७ टक्के इतके अत्यल्प आहे. संस्थेत आजमितीस ५०५ कर्मचारी ८८७ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. ३० व्या वर्धापनदिनानिमित्त अध्यक्षांनी संपूर्ण महाराष्ट्रात संस्थेच्या शाखांची संख्या शतकपूर्तीकडे नेण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. शिवकृपा विविध संस्था व सहकार खात्यामार्फत विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. संस्थेच्या ६३ शाखांचा विस्तार असून, त्यापैकी ३१ कार्यालये स्वमालकीच्या जागेत आहेत. सर्व शाखांच्या दैनंदिन कामकाजांवर योग्य नियोजन व नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय कार्यालय, तसेच मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, कोरेगाव अशी पाच विभागीय कार्यालय आहेत. कोरेगाव येथे स्वमालकीच्या जागेत प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित असून, त्या माध्यमातून सेवक वर्गास प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे.

बँकिंग व सहकार क्षेत्रातील आव्हाणे विचारात घेता, संचालक मंडळाने अत्याधुनिक तंत्राचा अवलंब करीत एम एस सेवा, व्हिडिओ कॉन्फरसिंग सेवा, संगणक प्रणालीद्वारे ग्राहकांना तत्पर, अचूक व अद्यावत माहिती उपलब्ध होत आहे. संस्थेचा आकार व वाढता व्यवसाय आणि बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा याचा विचार करून निर्णयप्रक्रियेत अचुकतेबरोबरच गतिमानता येण्यासाठी संचालक मंडळाने अधिकार विकेंद्रीकरणाच्या कक्षा व्यापक केल्यामुळे निर्णय प्रक्रिया व दर्जेदार सेवा ग्राहकांना देता येत आहे.